जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७८ दिनांक - २९/०१/२०२४**

हडपसर पोलीस ठाणे पुणे शहर

## घरफोडीसह,दुचाकी चोरीचे गुन्हे उघड करून गुन्ह्यातील सर्व मालमत्ता केला हस्तगत

दि.२३/०१/२०२४ रोजी यातील फिर्यादी यांचे फुरसुंगी भेकराई रोड,खुटवड चौक,पुणे येथील राहते घर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे घराचा कडी-कोयंडा तोडुन घरात प्रवेश करुन,घरातील सोन्याचे दागीने,डायमंड रिंग,रोख रक्कम व इतर साहीत्य असा एकुण ३,४०,७००/- किंचा मुद्देमाल घरफोडी चोरी करुन नेल्याने अज्ञात इसमाविरूद्ध **हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं १७७/२०२४ भादंवि कलम ४५७,३८०** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्यातील घटनास्थळ परिसरात प्राप्त झालेल्या तांत्रिक विश्लेषणावरून सपोनिरी.अर्जुन कुदळे, पोउपनिरी.अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार, अनिरूध्द सोनवणे, प्रशांत दुधाळ व निखील पवार असे शोध घेत असताना तपास पथकास मिळालेल्या गोपनीय माहीतीचे आधारे सदर गुन्हा हा आरोपी नामे **१) ऋषिकेश संतोष मोटे,वय २० वर्ष,रा.फुरसुंगी रोडवर खुटवड चौक,फुरसुंगी,पुणे २)प्रदीप भागवत पौळ,वय २० वर्ष,रा.चंदवडी कॅनॉल जवळील बिल्डींग मध्ये फुरसुंगी,पुणे ३)कृष्णा भिमा पवळ,वय १९ वर्ष,रा.कामठे आळी,फुरसुंगी,पुणे** यांनी केला असल्याचे माहीती मिळाली. त्यावरून नमुद तिन्ही संशयीतांना ताब्यात घेवून तपास केला असता त्यांचा नमुद गुन्ह्यात सहभाग आढळल्याने त्यांना नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

त्यांचेकडे अधिक तपासात आरोपी ऋषीकेश मोटे याच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेले सर्व माल हस्तगत करण्यात आला असून अधिक तपासादरम्यान आरोपीकडून १)हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं १८२७/२०२३,भा.दं.वि.कलम ३७९ मधिल चोरीस गेलेली ५०,०००/- कि.ची पॅशन प्रो मोटार सायकल २) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१०९/२०२४,भा.दं.वि.कलम ३७९ मधिल चोरीस गेलेली १,५०,०००/- रू किचीबुलेट अशा दोन गाड्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. एकंदरीत तपासा दरम्यान आरोपींकडून एकूण ५,४०,७००/- रू कि.चा मुद्देमाल हस्तगत केला असून तीन गुन्ह्यांची उकल झालेली आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार,मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-५, श्री.आर.राजा यांचे मागदर्शनाखाली सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे,श्रीमती.अश्विनी राख, हडपसर पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.रविंद्र शेळके, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विश्वास डगळे, श्री.संदीप शिवले यांचे सुचनाप्रमाणे तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,अर्जुन कुदळे, पोलीस उप निरीक्षक,अविनाश शिंदे, पोलीस अंमलदार, सुशील लोणकर, संदीप राठोड, जोतीबा पवार,सचिन जाधव, प्रशांत टोणपे, प्रशांत दुधाळ, निखील पवार, अतुल पंधरकर, अनिरूध्द सोनवणे, भगवान हंबर्डे, सचिन गोरखे, अजित मदने, चंद्रकांत रेजीतवाड, अमोल दणके, कुंडलीक केसकर, रामदास जाधव, अमित साखरे यांचे पथकाने केली आहे.